# पूर्णवादी नागरीक सहकारी बँकेचा मनमानी कारभार

# डॉ.सुभाष जोशीसह संचालक मंडळाने रिझर्व्ह बँकेच्या नियमाचे केले उल्लंघन

## ठेवीदार,खातेदारांना अंधारात ठेवून,अपात्र संचालकाला ठेवले बँकेवर

## डॉ.सुभाष जोशी खातेदार,ठेवीदारांच्या विश्वासाला तडा जाऊन देऊ नका

## डॉ.निरंतरांनी मोठ्या कष्टाने पूर्णवादी बँक उभा केली आहे

बीड (सरकार): पूर्णवादी नागरीक सहकारी बँक मर्या,बँकेने बोगस कागदपत्राच्या आधारे कोट्यावधी रूपये देऊन डॉ.सुभाष जोशी यांनी भेदभाव करत एका मॅनेजरवर गुन्हा दाखल तर दुसऱ्या मॅनेजरला मोकळे सोडून मनमानी कारभार केला. मात्र आता याच बँकेवरील अध्यक्ष डॉ.सुभाष जोशीसह संचालकांनी हम करे सो कायदा या म्हणीप्रमाणे वागून आरबीआयच्या नियमाचे उल्लंघन करून अपात्र संचालकांना बँकेच्या संचालक मंडळावर तसेच ठेवून आपला कारभार डॉ.सुभाष जोशी चालवत आहेत. त्यामुळे ठेवीदार, खातेदारांमध्ये प्रचंड खळबळ उडाली असून नेमके पूर्णवादी नागरीक सहकारी बँक कोणाच्या नियमाने, कोणाच्या सुचनेने चालते हेच कळेनासे झाले आहे. त्यामुळे डॉ.सुभाष जोशी खातेदार, ठेवीदारांच्या विश्वासाला तडा जाऊन देऊ नका. आरबीआयच्या नियम आणि सुचनांचे पालन करा आणि तात्काळ अपात्र संचालकांना संचालक मंडळावरून बाहेर काढावे. आणि बोगस कर्ज वाटप प्रकरणी तात्काळ बँकेतील दोषी वरिष्ठ, अधिकारी कर्मचाऱ्यावर गुन्हे दाखल करावेत अशी मागरी करण्यात आली आहे.

सहकार क्षेत्रातील बँका रिझर्व्ह बँकेच्या




नियमाने व सुचनांवर चालते. मात्र पूर्णवादी नागरीक बँकेचा मनमानीपणा एवढा वाढला आहे की. रिझर्व्ह बँकेच्या नियमाने उल्लंघन केले जात आहे. पूर्णवादी बँकेच्या अध्यक्षपदावर विराजमान झालेले डॉ.सुभाष जोशी रिझर्व्ह बँकेच्या नियमाला मानत नाहीत का? असा प्रश्न उपस्थित होतो. याच अध्यक्षाच्या काळात बोगस पावत्यावर, बोगस वेअर हाऊस दाखवून कोट्यावधी रूपये दिले गेले. आणि प्रकरण अंगलट आल्यानंतर देळेवर गुन्हा दाखल केला. मात्र तत्कालीन मॅनेजर रमेश मुंडलिक यांनी आतापर्यंत केलेला कारभार दैनिक सरकार एक एक मुद्दा बाहेर काढणारच आहे. मात्र रमेश मुंडलिकला जाणून बुजून बाजूला काढून गुन्हा दाखल न करता ज्या पद्धतीने डॉ.सुभाष जोशी यांनी खेळी केली आणि नामानिराळे झाले. मात्र दैनिक सरकारचा तिसरा डोळा रमेश मुंडलिकवर आणि त्यांनी केलेल्या कारभारावर ठेवूनच आहे. आणि हे सर्व बाहेर निघणारच आहे. मात्र रिझर्व्ह बँकेच्या नियमाने आणि



सुचनांचे कशा पद्धतीने पूर्णवादी बँकेचे अध्यक्ष डॉ.सुभाष जोशी व संचालक मंडलाने पायंदळी तुडवत अपात्र संचालकांना संचालक मंडळावरून न काढता तसेच ठेवून खातेदार, ठेवीदारांमध्ये असंतोष निर्माण केला आहे. त्यामुळे रिझर्व्ह बँक आणि सहकार आयुक्त यांच्याकडे लेखी स्वरूपात डॉ.सुभाष जोशींचा कारभार, त्यांच्या कार्यकाळातील नियमांचे उल्लंघन, अपात्र संचालक, संचालक मंडळावर ठेवणे या संदर्भात तक्रार करण्यात आली आहे.


beedsarkar

संपादक–आदोडे साहस

E-mail : beedsarkar @ Gmail.com

E-mail : beedsarkar @ Gmail.com किंमत: १ रू. पाने : ४

# बीडसरकार

बीड महाराष्ट्र वर्ष १३ वे अंक २२३ मंगळवार १४ जुलै २०२६ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दि.१५ जुलै २०२६ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHITRA Year 13 Issu 223 Tuesday 14 Jully 2026 RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027


दैनिक बीड सरकारचा दणका

# सिताई कन्स्ट्रक्शनच्या नावाखाली चांगले काम चालू असल्याचे दाखविण्यासाठी अनेकांची चमकोगिरी

# सव्वा कोटी रस्त्याच्या बोगसपणाला बीड न.प.चा कंदील हिरवा

## आ.विजयसिंह पंडित यांनी सिताई कन्ट्रक्शनने उखडून ठेवलेले रस्ते,अर्धवट कामे, बोगस कामाला आळा घालवा

## नालीच्या कामात लोखंडी गज कोणत्या दर्जाचे, किती अंतरावर सगळ काही अलबेल

## कोट्यावधीचा निधी बोगस रस्त्यातून थेट शिरसागरच्या खिशात

# २०२० ते २०२६ सिताई कन्ट्रक्शनने बोगस कामातून घातलेला धुमाकूळ लवकरच वाचकांसमोर

बीड (सरकार): बीड नगरपालिकेची सत्ता आ.विजयसिंह पंडित यांच्या हाती दिली. मात्र बीड नगरपालिकेने एकच गुत्तेदार पोसण्याचे धोरण गेल्या अनेक वर्षांपासून केले. आता तरी बदल होईल अशी अपेक्षा होती. मात्र आ.विजयसिंह पंडितांनीही या गुत्तेदाराला जवळ केले आणि बीड शहरातील सिताई कन्ट्रक्शनला मिळालेले कामे नगरपालिकेने झाकले. मात्र काही ठिकाणी सुरू असलेले कामे जाणून बुजून अर्धवट रस्ते खोदले, नाल्या अर्धवट बांधल्या. अनेक रस्त्यात नुसता मुरूम, दगडगोठे टाकून नालीचे बांधकाम सुरू केले. या नालीच्या बांधकामात वापलेले लोखंडेचे गज गंजलेले आणि कमी दर्जाचे दिसून येत आहेत तरी सुध्दा नगरपालिकेच्या अभियंत्यांनी या गुत्तेदाराला पाठीशी घातले. १२० मीटरच्या रस्त्याला क्षमतेपेक्षा जास्त निधी देऊन बीड नगरपालिकेने या गुत्तेदाराला डोक्यावर घेतले. मात्र याच गुत्तेदाराचे आता २०20 पासून २०२६ पर्यंत केलेल्या बोगस कामाचा धुमाकूळ निघणार आहे. एवढेच नव्हे तर या सालानंतर मागेही काय दिवा लावला. कोठे कोठे लावला हे दिसून येणार आहे. मात्र आज तरी सिताई कन्ट्रक्शनने जाणून बुजून शहरातील अर्धवट कामे सोडून बीडकरांना वेठीस आणले आहे. दोन चार जणांना सोबत घेऊन चांगले काम असल्याचे दाखविण्यासाठी अनेकांकडून चमकोगिरी केली जात आहे. मात्र प्रत्यक्षात काय आहे हे आता समोर येणार आहे. त्यामुळे आ.विजयसिंह पंडित यांनी सिताई कन्ट्रक्शनच्या गुत्तेदाराला बीड न.प.अंतर्गत कामासाठी निवड करूनही आणि पर्याय म्हणून दुसरा चांगला काम करणारे कन्ट्रक्शन निवडून बीड शहराचा विकास करून दाखववावा अशी चर्चा होत आहे.

बीड नगरपालिकेतून विकासाची गंगा




आणून शहर सुजलाम सुफलाम करण्याचे वचन बीडकरांना आ.विजयसिंह पंडित यांनी दिले. आणि बीडकरांनीही विश्वास टाकून बीड नगरपालिकेच्या सत्तेची चावी आ.पंडित यांच्या हाती दिली. मात्र आज शहरात घाणीचे साम्राज्य बरोबर बोगस रस्ते व नालीचे काम सुरू आहे. एकाच वेळी अनेक ठिकाणी रस्ते उखडून अनेक ठिकाणी नाल्याचे कामे सोडून सिताई कन्ट्रक्शन चांगले काम करत असल्याचे दाखविण्यासाठी अनेक जण चमकोगिरी करत आहे. काम चांगले असल्याची दैनिक सरकारच्या बातमीच्या दणक्याने ही वेळ आली आहे. ही तर सुरूवात आहे. २०२० ते २०२६ च्या पुढे सिताई कन्ट्रक्शनने कुठे, कधी आणि कसे कामाच्या माध्यमातून बोगसगिरीचे दिवे लावले आहेत हे आता समोर येणार आहे. त्यामुळे आज रस्त्यावर उभा राहून चार पदाधिकारी घेऊन शहरात चाललेली कामे सुरू आहेत ही करण्याची वेळ आली आहे. मात्र आज पेठ बीडपासून नगरपालिकेपर्यंत आणि इतर ठिकाणी कशा पद्धतीने अर्धव कामामुळे लोक मोटारसायकलवरून पडत आहेत. एवढेच नव्हे तर शाळेतील विद्यार्थ्यांना जाणे येणे मुश्कील झाले आहे. नाले उकरून ठेवल्याने घरातील सांडपाणी, इतर पाणी रस्त्यावर आले आहे. मात्र सिताई कन्ट्रक्शनचे चांगले काम दाखविण्यासाठी अनेकजण चमकोगिरी करत फिरत आहे. मात्र आज तरी बीड नगरपालिकेच्या आशीर्वादाने अनेक कामे सिताई कन्ट्रक्शनला मिळाली मात्र बीडकरांना वेगळे काही हवे होते. आणि ते आ.पंडित देतील अशी अपेक्षा होती. मात्र येथेही बीडकरांची अपेक्षा गळून पडली आणि पुन्हा तेच सिताई कन्स्ट्रक्शनला बीड न.प.ने डोक्यावर घेतले. सिताईचा कामाचा इतिहास न.प.ला चांगलाच माहिती आहे. आणि निधी देतानाही रस्त्याचे काम, त्याचा दर्जा, त्याची लांबी, रूंदी न पाहता छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून जि.प.च्या कार्यालयापर्यंत अवघ्या १२० मीटर रस्त्याच्या कामासाठी सव्वा कोटी रूपये देऊन सिताई कन्ट्रक्शनच्या गुत्तेदाराला मालामाल करण्याचा न.प.ने निश्चय केलाय की काय असे दिसून येत आहे. त्यामुळे चांगले समाजसेवकांनी आंदोलनाच्या माध्यमातून या कामा संदर्भात आवाज उठवून हे काम जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे आणि कामापुरता निधी द्यावा अशी चर्चा होत आहे.

## प्लॉटिंग व्यवहारातून माजी खरेदी-विक्री संघाच्या माजी अध्यक्षासह दोघा जनाविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा

माजलगांव (सरकार): प्लॉटिंगच्या व्यवहारात गुंतवलेली रक्कम व व्यवहारातील नफ्याचा हिस्सा परत न देता विश्वासघात केल्याचा तसेच शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करत माजलगाव शहर पोलीस ठाण्यात माजी खरेदी–विक्री संघाच्या माजी अध्यक्षासह दोघे जना विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, माजलगाव शहर पोलीस ठाणे गुन्हा क्र. २३७/२०२६मध्ये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३१६(१)(२), ३५२, ३५१(१)(२) व ३(५)अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या प्रकरणातील फिर्यादी नवनाथ गणपत पवार (वय ४२, व्यवसाय ह्न शेती व व्यापार, रा. वारोळा तांडा, ता. माजलगाव, जि. बीड) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, प्लॉटिंगच्या व्यवहारासाठी आरोपींना मोठी रक्कम देण्यात आली होती. तसेच व्यवहारातून मिळणाऱ्या नफ्यातील हिस्सा देण्याचे आश्वासनही देण्यात आले होते. मात्र, व्यवहारानंतर ना मूळ रक्कम परत करण्यात आली, ना नफ्याचा हिस्सा देण्यात आला. ही रक्कम उभी करण्यासाठी त्यांनी कर्ज काढले होते. तरीही आरोपींनी विश्वासघात करून आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.या प्रकरणी दीपक जगन्नाथ जाधव, सौरभ दीपक जाधव व अभिषेक जाधव (सर्व रा. बँक कॉलनी, माजलगांव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीच्या तक्रारीनुसार, दि. १० जुलै २०२६रोजी सकाळी सुमारे १०.०० वाजता बँक कॉलनी, माजलगाव येथे आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या तक्रारीवरून दि. १३ जुलै २०२६ रोजी माजलगांव शहर पोलीस ठाण्यात संबंधित गुन्हा दाखल करण्यात आला असून, प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.




## संपादकीय

# गोकुळच्या रणांगणात ठरावांची चुरस

'गोकुळ' निवडणुकीच्या निमित्ताने राजकीय पारा चांगलाच चढला आहे. जिल्हा परिषद किंवा विधानसभेइतकेच महत्त्व प्राप्त झालेल्या या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातील वर्चस्वाची लढाई आता अंतिम टप्प्यात आली असून, गावोगावी सुरू असलेल्या ठराव संकलनाच्या स्पर्धेने संपूर्ण पश्चिम महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले आहे.पूर्ण पश्चिम महाराष्ट्रातील सहकार चळवळीचा कणा मानल्या जाणाऱ्या गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीने संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्यात राजकीय वातावरण तापवले आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती किंवा विधानसभा निवडणुकांइतकेच महत्त्व गोकुळच्या निवडणुकीला प्राप्त झाले असून, गेल्या काही दिवसांपासून ठराव संकलन, सभासद संस्थांशी संपर्क आणि राजकीय मोर्चेबांधणीला अभूतपूर्व वेग आला आहे. गावोगावी बैठका, कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी आणि दूध उत्पादक संस्थांच्या ठरावांसाठी सुरू असलेली स्पर्धा यामुळे गोकुळची निवडणूक राज्याच्या सहकार क्षेत्रातील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरली आहे.

प्रत्येक प्रमुख गटाने आपल्या बाजूने मोठ्या प्रमाणात सभासद संस्था आणि ठराव जमा झाल्याचा दावा केला आहे. मात्र, या दाव्यांना अद्याप निवडणूक अधिकाऱ्यांकडून अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. त्यामुळे सर्वाधिक ठराव कोणाकडे? किंवा सर्वाधिक सभासदांचा पाठिंबा कोणाला? या प्रश्नाचे अंतिम उत्तर अधिकृत पडताळणीनंतरच स्पष्ट होणार आहे. मात्र तरीही वैद्यकीय शिक्षण मंत्री असलेल्या अजित पवार राष्ट्रवादी पक्षाचे नेते हसन मुश्रीफ यांनी यात आघाडी घेतल्याचे म्हटले जाते. तराजू महायुतीच्या बाजूने झुकत असला तरी नेत्यांची स्वतःची म्हणून ही काही महत्त्वाकांक्षा असते ज्यामुळे महायुती आणि महाविकास आघाडी अशा थेट लढतील काही छुपे राजकारणही घडू शकते. यंदाच्या निवडणुकीत मतदार यादी, सभासद संस्थांची पात्रता आणि ठरावांची वैधता हे तीन प्रमुख मुद्दे ठरले आहेत. अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या सभासद नोंदणीवरील वाद, काही संस्थांच्या पात्रतेबाबत झालेले आक्षेप आणि न्यायालयीन प्रक्रिया यामुळे ही निवडणूक सुरुवातीपासूनच चर्चेत राहिली. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर निवडणूक प्रक्रियेला गती मिळाली आणि आता प्रत्यक्ष राजकीय लढतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.राजर्षी शाहू शेतकरी आघाडी, महायुतीशी संबंधित नेते तसेच इतर स्थानिक सहकारी गटांनी गावपातळीवर व्यापक संपर्क मोहीम राबवली आहे. दूध उत्पादक संस्थांच्या प्रतिनिधींशी संवाद, विकासकामांचा आढावा, दूध उत्पादकांना अधिक दर, आधुनिक तंत्रज्ञान, पशुसंवर्धन सुविधा आणि संघाच्या भविष्यातील धोरणांवर विविध गटांकडून आश्वासने दिली जात आहेत. त्यामुळे ही निवडणूक केवळ संचालक मंडळापुरती मर्यादित न राहता ग्रामीण अर्थकारण आणि सहकाराच्या भवितव्याशी जोडली गेली आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, गोकुळची निवडणूक ही कोल्हापूर जिल्ह्यातील आगामी राजकीय समीकरणांची रंगीत तालीम मानली जाते. या निवडणुकीत कोणत्या गटाला यश मिळते, यावर भविष्यातील स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा बँका आणि इतर सहकारी संस्थांमधील राजकीय समीकरणांवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे राज्यातील अनेक प्रमुख नेत्यांचेही या निवडणुकीकडे लक्ष लागले आहे. गोकुळ हा केवळ दूध संघ नाही, तर हजारो शेतकरी कुटुंबांच्या आर्थिक स्थैर्याचा आधार आहे. दूध संकलन, प्रक्रिया, मूल्यवर्धित दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती आणि ग्रामीण भागातील रोजगार निर्मितीत गोकुळची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे संघाचे नेतृत्व कोणाकडे जाते, याला केवळ राजकीय नव्हे तर आर्थिक आणि सामाजिक महत्त्वही आहे.दरम्यान, काही गटांनी सर्वाधिक ठराव आपल्या बाजूने आल्याचा दावा केला असला, तरी विरोधी गटांनी हे दावे फेटाळले आहेत. अधिकृत यादी जाहीर होईपर्यंत कोणत्याही गटाचा विजय निश्चित मानता येणार नाही, असे निवडणूक प्रक्रियेवर लक्ष ठेवणाऱ्या जाणकारांचे मत आहे.

# मोक्षाची अनुभूती



क्षणिक सुखासाठी अपुल्या कुणी होतो नीतीभ्रष्ट कुणी त्यागी जीवन अपुले दुःखं जागी करण्या नष्ट देह करी जे जे काही आत्मा भोगितो नंतर जैसे ज्याचे कर्म तैसे फळ देतो रे ईश्वर

एक असे गीत आहे की, ज्याचा अर्थ कुणालाही खऱ्या अर्थाने कळलाच नाही. त्याचे कारणही तसेच आहे. आज सारेचजण ऐहिक सुखाच्या उपभोगत अडकलेले आहेत. इथे मला एक जंगलच्या राजाची सिंहाची एक छोटीशी, साधीशी कथा आठवते आहे. तर कथा अशी आहे, जंगलातील एक सिंह अनेक दिवस उपाशी होता. एक दिवस त्याला एक छोटासा गोजिरवाणा ससा दिसला. पण त्याने विचार केला या छोट्याशा सशाने माझं पोट कसं भरणार? म्हणून त्याने त्याला सोडून दिलं. पुढे त्याला एक धष्टपुष्ट काळवीट दिसलं. सिंहाने त्याच्यावर हल्ला केला, पण उपासमारीने थकलेल्या शरीरात ताकद उरली नव्हती आणि सिंहाला पाहून काळवीट जोराने पळून गेलं आणि सिंह काही त्याचा पाठलाग करू शकला नाही. शेवटी सिंहाने ठरवलं की, जाऊदे आता निदान छोटासा ससा तर ससा त्याला तरी खाऊन पोट भरावं. पण एव्हाना ससा सिंहाची चाहूल लागल्यामुळे पळून गेला होता. अशा रीतीने सिंह आपल्या कर्मामुळे उपाशी राहिला. कथा तशी खूपच साधी आहे आणि त्याचा निष्कर्ष देखील. आपल्या एका निर्णयामुळे आपल्याला दूरगामी परिणाम हे भोगावे लागतात.

अगदी साध्या शब्दात सांगायचे झाले तर जसं एखाद्या स्वयंपाकघरात लहान वाटीतील थोडं अन्न नाकारलं जातं, तसा सिंहाने समोर आलेला तो गोजिरवाणा ससा नाकारला. त्याला वाटलं की, ही छोटी वाटी त्याच्या भुकेला पुरेशी नाही. पुढे त्याला मोठ्या परातीत भरलेलं जेवण म्हणजे धष्टपुष्ट काळवीट दिसलं. पण जेव्हा त्याने त्या परातीवर हात मारला, तेव्हा ती परात जोराने निसटून गेली. उपासमारीने थकलेल्या सिंहाकडे ती पकडण्याची ताकदच उरली नव्हती. शेवटी, सिंहाच्या ताटात काहीच उरलं नाही. वाटीही रिकामी, परातही रिकामी आणि सिंहाच्या पुढ्यात फक्त रिकामं ताट उरलं.

ही कथा आपल्याला सांगते की जीवनात छोट्या संधी नाकारून मोठ्या संधीच्या मागे धाव घेतली, तर शेवटी दोन्ही हातातून निसटतात. जसं स्वयंपाकघरात भांड्यांचा आवाज आपल्याला आठवण करून देतो की प्रत्येक कणाचं महत्त्व आहे, तसंच जीवनात प्रत्येक क्षणाचं महत्त्व आहे. सिंहाची उपासमार म्हणजे रिकाम्या भांड्यांचा आवाज जो आपल्याला शिकवतो की कर्माने मिळालेलं जे काही आहे, त्याची किंमत ओळखली नाही, तर शेवटी फक्त शून्य उरते आणि हेच तर जीवनाचं गूढ तत्त्वज्ञान आहे. देह जे काही करतो मग तो लहानसहान निर्णय असो वा कुठलाही मोठा, त्याचे परिणाम आत्म्याला भोगावे लागतात. सिंहाने छोट्या सशाला नाकारलं, मोठ्या काळविटाच्या मागे धाव घेतली, पण शेवटी दोन्ही हातातून निसटले. हे त्याच्या देहाचे कर्म होते. पण त्याचा परिणाम आत्म्याला म्हणजेच त्याच्या अस्तित्वाला उपासमारीच्या रूपाने भोगावा लागला.

जीवनात प्रत्येक कर्माचं महत्त्व आहे. कणभराने देखील संपूर्ण परातभर पदार्थ हा बिघडू शकतो. अर्थात,जीवनात प्रत्येक क्षण हा कणासारखा असतो. त्याला दुर्लक्षित केलं तर संपूर्ण जीवनाची परात रिकामी होऊ शकते आणि हीच कर्माची शिकवण आहे आणि हाच ईश्वराचा न्याय म्हणजे कर्माचं भांड अर्थात, जैसे ज्याचे कर्म तैसे फळ. ज्याने छोट्या संधीची किंमत ओळखली नाही, त्याला मोठ्या संधीचं फळही मिळत नाही. आणि ज्याने प्रत्येक कणाचं महत्त्व ओळखलं, त्याला जीवनाच्या परातीतील भरभरून सुग्रास अन्न मिळतं. कसं आहे ना की, आजच्या जीवनात माणूस सतत तृष्णेच्या घुंगुरवाळ्यात अडकलेला आहे. छोट्या संधी नाकारून मोठ्या स्वप्नांच्या मागे धाव घेतो, पण शेवटी दोन्ही हातातून निसटतात. नोकरीत, नातेसंबंधात किंवा दैनंदिन निर्णयांत आपण वाटीतील अन्न नाकारतो आणि परातीच्या मागे धावतो. पण जेव्हा परात निसटते, तेव्हा आपल्या ताटात फक्त रिकामं भांड उरतं. हीच कथा आपल्याला सांगते की जीवनात प्रत्येक क्षणाचं महत्त्व आहे. जन्मांध सावली जशी प्रकाशाला ओळखत नाही, तशीच आपण छोट्या संधींची किंमत ओळखत नाही. पण त्या सावलीतूनच प्रकाशाचा मार्ग सापडतो. कर्म म्हणजे वाळूतील पाऊलखुणा असल्या तरी त्या खुणा कधी पुसल्या जातात, कधी टिकून राहतात. पण प्रत्येक खुण आत्म्याला पुढे नेते. कर्माच्या वाळूतील पाऊलखुणा या काळाच्या लाटांनी पुसल्या जाऊ शकतात, पण त्यांचा ठसा आत्म्यावर कायम राहतो. त्यांना दुर्लक्षित केलं तर संपूर्ण आयुष्य वैरण होऊ शकते. मोक्ष प्राप्तीचा मार्ग हा क्षणभंगुर सुखांच्या पाचोळ्यासारखा हलका नाही, तर तो कर्माच्या वाळूतील पाऊलखुणांनी उमटलेला गहिरा प्रवास आहे. प्रत्येक खुण आत्म्याला पुढे नेते, अज्ञानाच्या जन्मांध सावलीतून बाहेर काढते. तृष्णेच्या घुंगुरवाळ्यात अडकलेला जीव जेव्हा मुक्त होतो, तेव्हा त्याला नक्षत्रावरून आलेली पर्जन्यसुक्ताची माहेरवाशिणीची हाक ऐकू येते आणि तीच मोक्षाची खरी अनुभूती आहे.

आई जगदंबेने तळपायाच्या नोंदी करून आपल्याला या जगताच्या भूलभुलय्यामध्ये प्रारब्धवादी वसंतोत्सवात आपल्या कर्माचे घोडे दौडण्याकरिता पाठवले आहे. या तळपायाच्या नोंदी म्हणजे जीवनातील प्रत्येक पाऊल. त्या नोंदी कधी वेदना देतात, कधी सुख देतात. यातील प्रत्येक पाऊल आणि प्रत्येक कर्माच्या घोड्याची टाच ही आत्म्याच्या प्रवासात एक ठसा उमटवते, जे पुढे जाऊन प्रत्येकाला कर्माचा खरा अर्थ समजावते पण, या नोंदी केवळ ठसेच नसतात, त्यांच्यासोबत एक ओझंही वाहिलं जातं. त्या पावलांनी निर्माण झालेलं ओझं म्हणजेच भलावण होय. हे ओझं कधी हलकं वाटतं, कधी जड होतं, पण तेच आत्म्याला पुढे नेणारं असतं. भलावण म्हणजे कर्माचं वजन, जे जीवनाच्या प्रवासाला दिशा देतं आणि आत्म्याला त्याच्या मार्गावर पुढे नेतं. आणि शेवटी, ईश्वराचा न्याय म्हणजे नक्षत्रावरून आलेली पर्जन्यसुक्ताची माहेरवाशिणीची हाक. ती हाक आपल्याला आठवण करून देते की जैसे ज्याचे कर्म तैसे फळ. ज्याने छोट्या संधीची किंमत ओळखली नाही, त्याला मोठ्या संधीचं फळही मिळत नाही. अखेरीस माझ्याच शब्दात सांगायचं झालं तर... तृष्णेच्या घुंगुरवाळ्यात जीव गुंतला... जन्मांध सावलीत सत्य हरपला... तळपायाच्या नोंदींनी कर्माच्या पाऊलखुणा उमटल्या... नक्षत्राच्या भलावण वाहून मोक्षाच्या ठसा उमटवल्या...

–ऋतुजा केळकर



# तुळशीच्या पानांनी उजळेल चेहरा

**स्वच्छ, तेजस्वी आणि निरोगी त्वचा ही सगळ्याच तरुणींची इच्छा असते. मात्र प्रदूषण, ताणतणाव आणि बदलती जीवनशैली यामुळे मुरुम, डाग-धब्बे आणि त्वचेचा निस्तेजपणा वाढतो. अशा वेळी आपण एक घरगुती, स्वस्त आणि सुरक्षित उपाय वापरू शकतो तो म्हणजे तुळस. तुळस ही औषधी गुणांचा खजिना आहे. तुळशीमध्ये असलेले अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-ऑक्सिडंट गुण त्वचेच्या समस्या मुळापासून कमी करण्यास मदत करतात.**

तुळशीमध्ये अँटी-इन्फ्लेमेटरी गुण असल्यामुळे त्वचेवरील सूज, लालसरपणा आणि मुरुम कमी होतात. तुळशीचं नियमित सेवन केल्याने शरीरातील विषारी घटक बाहेर टाकले जातात आणि त्वचा आतून स्वच्छ होते. तज्ज्ञांच्या मते, तुळस ही महागड्या क्रीम्स आणि केमिकल ट्रीटमेंटपेक्षा जास्त सुरक्षित आणि परिणामकारक आहे.

**■ तुळशीचा फेस पॅक**

मुरुम आणि डागांसाठी ८-१० तुळशीची पानं बारीक वाटून त्यात मुलतानी माती किंवा मध मिसळा. हा लेप २० मिनिटं चेहऱ्यावर लावा आणि नंतर कोमट पाण्याने धुवा. आठवड्यातून २ वेळा वापरल्यास त्वचेत लक्षणीय सुधारणा दिसू शकते.

**■ तुळशीचं पाणी**

रात्री एक ग्लास पाण्यात ५-७ तुळशीची पानं भिजत ठेवा. सकाळी उपाशीपोटी हे पाणी प्या. यामुळे शरीर आतून स्वच्छ होतं, चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येते आणि नवीन मुरुम येणं कमी होतं.

**■ तुळशीचा चहा**

तणावामुळे होणाऱ्या मुरुमांसाठी तुळशीचा चहा फायदेशीर ठरतो. तुळशीची पानं पाण्यात उकळून त्यात थोडं मध किंवा लिंबू घालून प्या. हा चहा रोगप्रतिकारक शक्ती वाढवतो, ताण कमी करतो आणि त्वचेचा रंग सुधारतो.

आयुर्वेद तज्ज्ञांच्या मते, तुळशीबरोबरच संतुलित आहार, भरपूर पाणी आणि नियमित झोप आवश्यक आहे. मुरुमांची समस्या खूप गंभीर असल्यास डॉक्टरांचा सल्ला जरूर घ्यावा.

# ओठांचा कोरडेपणा होईल दूर



अनेक महिलांना ओठ कोरडे होणे, फुटणे किंवा काळपट दिसणे अशी समस्या जाणवते. शरीरात पाण्याची कमतरता, हवा, तीव्र ऊन यामुळे ओठ सर्वात आधी कोरडे पडतात. ही समस्या दूर करण्यासाठी अनेक महिला वारंवार लिप बाम लावतात. मात्र, काही लिप बाम ओठ बरे करण्याऐवजी उलट अधिक कोरडे करतात. जर तुमचे ओठ सतत कोरडे, फाटलेले आणि निस्तेज दिसत असतील आणि लिप बाम लावूनही फरक पडत नसेल, तर आता घरगुती आणि नैसर्गिक उपाय वापरण्याची वेळ आली आहे. हे उपाय ओठांना मुलायम, गुलाबी आणि निरोगी बनवण्यास मदत करतात.

**■ मध**

मधात नैसर्गिक ओलावा असतो. रात्री झोपण्यापूर्वी ओठांवर मध लावा आणि सकाळी कोमट पाण्याने धुवा. रात्रभर ठेवायचे नसेल तर २ ते ३ तासांनी ओठ धुऊ शकता.

**■ नारळ तेल**

नारळ तेल ओठांचा कोरडेपणा कमी करून त्यांना मऊ बनवते. लिप बामऐवजी दिवसातून २-३ वेळा ओठांवर हलकं नारळ तेल लावा. यातील पोषक घटक ओठांसाठी फायदेशीर ठरतात.

**■ साखर आणि तुपाचा स्क्रब**

ओठांवर पपडी जास्त साचत असेल तर हा उपाय उपयोगी आहे. १ चमचा बारीक साखर आणि काही थेंब तूप मिसळून हलक्या हाताने ओठांवर स्क्रब करा. यामुळे मृत त्वचा निघून जाते. साखर खूप जाड नसावी, अन्यथा ओठांना इजा होऊ शकते.

**■ कोरफडीचा जेल**

कोरफड त्वचेसाठी जितकी फायदेशीर आहे, तितकीच ओठांसाठीही उपयुक्त आहे. दररोज झोपण्यापूर्वी ओठांवर एलोवेरा जेल लावा. यामुळे ओठांना थंडावा मिळतो आणि कोरडेपणा कमी होतो.

**■ दुधाची साय**

दुधाची साय ओठांचा कोरडेपणा कमी करून रंगत सुधारण्यास मदत करते. रात्री झोपण्यापूर्वी ताज्या दुधाची साय ओठांवर लावा. नियमित वापर केल्यास चांगला फरक दिसून येतो.

(प्रत्येक महिलांची त्वचा वेगळी असते, त्यामुळे कोणताही उपाय करण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घेणे योग्य आहे.)



# टोमॅटो सॉस घरी बनवा

**आजकाल बाजारात मिळणाऱ्या टोमॅटो सॉसमध्ये भेसळ, कृत्रिम रंग आणि जास्त प्रमाणात केमिकल्स वापरले जात असल्याच्या बातम्या वारंवार समोर येत आहेत. त्यामुळे पालकांमध्ये मुलांच्या आरोग्याबाबत चिंता वाढत आहे. अनेक मुलांना टोमॅटो सॉस खूप आवडतो, पण बाजारातील सॉसमध्ये जास्त साखर, प्रिझर्वेटिव्ह आणि कृत्रिम रंग असू शकतात. अशा वेळी घरच्या घरी तयार केलेला टोमॅटो सॉस हा उत्तम आणि सुरक्षित पर्याय ठरू शकतो.**

घरगुती टोमॅटो सॉस चविष्ट असण्यासोबतच पूर्णपणे शुद्ध आणि आरोग्यदायी असतो. विशेष म्हणजे तो बनवण्यासाठी फार वेळ लागत नाही. फक्त २० मिनिटांत स्वादिष्ट आणि हेल्दी टोमॅटो सॉस तयार होऊ शकतो. आपल्या आवडीनुसार त्यामध्ये गोडवा आणि मसालेही कमी-जास्त करता येतात.

टोमॅटो सॉस बनवण्यासाठी लागणारे साहित्य अगदी सोपे आहे. यासाठी एक किलो लाल पिकलेले टोमॅटो, दोन चमचे साखर, चवीनुसार मीठ, अर्धा कप व्हिनेगर, थोडी लाल तिखट पावडर, दोन ते तीन लसूण पाकळ्या आणि आवडीनुसार काळी मिरी व दालचिनी लागते.

सॉस बनवण्याची पद्धतही खूप सोपी आहे. सर्वप्रथम टोमॅटो स्वच्छ धुऊन त्याचे छोटे तुकडे करावेत. नंतर हे टोमॅटो एका भांड्यात घालून १० ते १५ मिनिटे उकळावेत. टोमॅटो मऊ झाल्यानंतर गॅस बंद करून ते थंड होऊ द्यावेत. त्यानंतर मिक्सरमध्ये वाटून त्याची बारीक पेस्ट तयार करावी. अगदी स्मूथ सॉस हवा असल्यास ही पेस्ट गाळून घ्यावी.

यानंतर टोमॅटोची पेस्ट कढईत टाकून मंद आचेवर शिजवायला ठेवावी. त्यामध्ये साखर, मीठ, लाल तिखट आणि इतर मसाले घालावेत. सॉस खाली लागू नये म्हणून सतत ढवळत राहावे. साधारण १५ ते २० मिनिटांनंतर सॉस घट्ट होऊ लागतो आणि त्याचा छान सुगंध येऊ लागतो.

सॉस घट्ट झाल्यावर त्यात व्हिनेगर घालावे. यामुळे सॉस जास्त दिवस टिकून राहण्यास मदत होते. आणखी पाच मिनिटे शिजवल्यानंतर गॅस बंद करून सॉस पूर्णपणे थंड होऊ द्यावा.

थंड झालेला सॉस स्वच्छ आणि कोरड्या काचेच्या बाटलीत भरून फ्रीजमध्ये ठेवावा. योग्य स्वच्छता पाळल्यास हा सॉस दोन ते तीन महिने सहज टिकू शकतो. घरचा बनवलेला हा टोमॅटो सॉस समोसे, पकोडे, फ्रेंच फ्राइज किंवा मुलांच्या स्नॅक्ससोबत खूपच स्वादिष्ट लागतो. आरोग्यदायी आणि भेसळमुक्त खाण्याचा पर्याय निवडायचा असेल, तर घरच्या घरी बनवलेला टोमॅटो सॉस नक्की करून पाहा.



# इमोशनल शॉपिंग

ऑफिसमध्ये ऋचाचे दर आठ-दहा दिवसांनी नवीन पार्सल यायचे. सुरुवातीला सगळ्यांना त्याचं विशेष काही वाटलं नाही, पण नंतर हे प्रमाण वाढत गेलं. शेवटी एक दिवस मी तिला सहज विचारलं, 'इतकी खरेदी कशासाठी करतेस?' त्यावर ती हसत म्हणाली, 'काही विशेष कारण नाही, मला शॉपिंग आवडतं.' तिचं हे साधं उत्तर मात्र मला विचार करायला भाग पाडून गेलं. खरंतर आपल्या आजूबाजूला ऋचासारख्या अनेक महिला आहेत. गरज नसतानाही खरेदी होते. मग प्रश्न पडतो, या खरेदीमागचं खरं कारण काय असतं?

बोलण्यातून आणि निरीक्षणातून एक गोष्ट लक्षात आली की, अनेक महिलांसाठी शॉपिंग म्हणजे फक्त खरेदी नसते, तर तो आनंद मिळवण्याचा आणि ताण कमी करण्याचा एक मार्ग असतो. काही महिलांना एकटं वाटलं, मन उदास झालं किंवा ताण वाढला की त्या शॉपिंगकडे वळतात. नवीन वस्तू घेतल्यावर काही क्षण का होईना, पण मन हलकं झाल्यासारखं वाटतं.

अनेकदा फक्त बघायला आले म्हणत दुकानात गेलेल्या महिला बाहेर पडताना चार पिशव्या घेऊन बाहेर येतात. यामागे अनेक कारणं असतात. त्यातील पहिलं कारण म्हणजे ताणतणाव. 'मूड खराब आहे, म्हणून थोडी खरेदी केली', हे वाक्य आजकाल सहज ऐकायला मिळतं.

दुसरं महत्त्वाचं कारण म्हणजे भावनिक जुळवणूक. विशेषतः दागिने, साड्या किंवा काही खास वस्तू घेताना महिलांचा त्या वस्तूंशी भावनिक संबंध तयार होतो. एखादी साडी पाहिली की आईची आठवण येते, तर एखादा दागिना स्वतःसाठी घेतलेलं छोटंसं बक्षीस वाटतं.

सेल आणि ऑफर्स हे देखील मोठं आकर्षण असतं. इतक्या कमी किमतीत मिळतंय, मग घेऊन टाकू, असा विचार अनेकदा खरेदीला प्रवृत्त करतो. पावसाळी सेल, फेस्टिव्हल ऑफर्स किंवा ऑनलाइन डिस्काउंट्स महिलांना सहज आकर्षित करतात.

ऑनलाइन शॉपिंगमुळे तर खरेदी आणखी सोपी झाली आहे. मोबाइलवर काही क्लिक केलं की वस्तू घरापर्यंत येते. सोशल मीडियावर दिसणारे नवीन ट्रेंड, फॅशन आणि जाहिराती खरेदीची इच्छा वाढवतात. इतरांकडे पाहून आपल्याकडेही ती वस्तू असावी असं वाटू लागतं.

काही महिलांच्या खरेदीमागे बालपणीच्या अपूर्ण इच्छा असतात. लहानपणी परिस्थितीमुळे या गोष्टी घेता आल्या नाहीत, म्हणून आता स्वतःसाठी घेत आहे, अशी भावना त्यांच्या मनात असते. तर काही महिला स्वतःसाठी नाही, तर मुलांसाठी खरेदी करतात. माझ्या मुलीला काही कमी पडू नये, या भावनेतून त्या अनेक वस्तू घेताना दिसतात.

मैत्रिणींसोबत शॉपिंगला गेल्यावरही नको असलेल्या गोष्टी घेतल्या जातात. त्या क्षणी मिळणारा आनंद आणि उत्साह वेगळाच असतो. पण महिन्याच्या शेवटी खर्चाचा हिशेब पाहताना अनेकांना धक्का बसतो.

खरेदी करणे चुकीचे नाही, पण ती गरज आणि मर्यादा लक्षात घेऊन केली तरच योग्य ठरते. महिन्याच्या शेवटी आपल्या खरेदीचा आढावा घेणं आवश्यक आहे. आपण खरंच गरजेच्या किती वस्तू घेतल्या आणि किती फक्त भावनेच्या भरात घेतल्या, याचा विचार प्रत्येकाने करायला हवा. जर ताणतणावामुळे सतत खरेदी होत असेल, तर त्याबद्दल आपल्या जवळच्या व्यक्तींशी बोलणं, एखादा छंद जोपासणं किंवा स्वतःसाठी वेगळा वेळ देणं अधिक उपयोगी ठरू शकतं. कारण खरा आनंद वस्तूंमध्ये नसून मनाच्या समाधानात असतो.

– मधु कुलकर्णी

# एसआयआर मॅपिंग नोंदणीमध्ये लोकसहभाग आवश्यक - तहसिलदार चंद्रकांत शेळके

## लोकशाही बळकट करण्यासाठी प्रशासनाला संपूर्ण सहकार्य करणार - अॅड.गोविंद शिराळे





**बीड (प्रतिनिधी):-** एसआयआर मॅपिंग नोंदणीमध्ये नागरिकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे कारण यामुळे प्रशासनाला अचूक, माहिती मिळण्यास मदत होते. या राष्ट्रीय कार्यात नागरीकांचा लोकसहभाग अत्यंत महत्वाचा आहे असे प्रतिपादन तहसिलदार चंद्रकांत शेळके यांनी केले.

बीड शहरातील वार्ड क्र. बीड शहरातील वॉर्ड क्रमांक २५ मध्ये 'एसआयआर मॅपिंग' नोंदणी आणि पडताळणी शिबिराचे आयोजन युवा नेते नगरसेवक अॅड. गोविंदा भैया शिराळे पाटील यांचे जनसंपर्क कार्यालय येथे दि.११ व १२ जुलै रोजी करण्यात आले होते. या प्रसंगी बीडचे तहसिलदार चंद्रकांत शेळके यांना प्रमुख पाहुणे म्हणून अमंत्रित करण्यात आले होते. यावेळी भाजपा नगरसेवक अॅड. गोविंद शिराळे पाटील यांनी तहसिलदार शेळके शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

यावेळी तहसिलदार चंद्रकांत शेळके म्हणाले की, स्थानिक रहिवाशांना त्यांच्या परिसराची भौगोलिक आणि सामाजिक परिस्थिती अचूक माहीत असते.नागरिकांकडून बीएलओ, निरीक्षकांना माहिती मिळाल्याने प्रशासकीय कामात पारदर्शकता येते असे सांगून एसआयआर मॅपिंग नोंदणीमध्ये लोकसहभाग महत्वाचा असल्याचे ते म्हणाले. यावेळी नागरीकांशी संवाद साधतांना लोकाभिमुक कार्यतत्पर नगरसेवक अॅड. गोविंद शिराळे यांनी तहसीलदार चंद्रकांतजी शेळके यांच्या समक्ष प्रशासनाला आवर्जून सांगितले की, राष्ट्र उभारणीच्या या दिव्य कामांमध्ये एक लोकप्रतिनिधी व लोकसेवक म्हणून माझे कार्यालय व येथील सर्व यंत्रणा हे यापुढेही संपूर्ण विशेष सखोल पुनर्निरीक्षण मोहीम संपेपर्यंत प्रभाग क्रमांक २५ मधील नागरिकांसाठी व प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी सतत २४ तास उपलब्ध आहे. यापुढेही कोणालाही काहीही अडचण असल्यास त्यांनी तात्काळ माझ्या ८८८८५५९९१ या संपर्क क्रमांकावर संपर्क करावा तसेच त्यांना तात्काळ मदत केली जाईल. असे आश्वासन युवा नेते कर्तव्यदक्ष नगरसेवक अॅड. गोविंद भैया शिराळे पाटील यांनी व्यक्त केले. वार्ड क्रमांक २५ व बीड शहरातील ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक, पत्रकार, डॉक्टर, वकील, समाजसेवक, प्राध्यापक, प्रतिष्ठित नागरिक, वार्ड क्रमांक २५ व बीड शहरातील मतदार यांच्यावतीने, एस आर मॅपिंग शिबिराचे केलेले योग्य अशी बैठक व्यवस्था व सर्व सुविधायुक्त उत्कृष्ट नियोजन याबद्दल वरील सर्वांनी युवा नेते नगरसेवक अॅड. गोविंद भैया शिराळे यांचे कौतुक करून जाहीर सत्कार केला. यावेळी नागरीकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद पाहता अजून एक दिवस शिबीराचा कालावधी करण्यात आला. एसआयआर मॅपिंग शिबिर यशस्वी करण्यासाठी बहुमोल परिश्रम घेणाऱ्यांचे अॅड.गोविंद शिराळे पाटील यांनी आभार व्यक्त केले.

# मुलांना मोबाईल पासून दूर ठेवा - पोलीस निरीक्षक शरद जोगदंड




**अंबाजोगाई (प्रतिनिधी):-** शहरातील प्रशांतनगर भागात अल्पावधीत नांवारूपाला आलेले संकल्प विद्या मंदिर येथे इयत्ता दहावीच्या व विविध स्पर्धा परीक्षेमध्ये शिष्यवृत्ती प्राप्त, विविध मेडल्स प्राप्त, गुणवत्ता यादीमध्ये झळकलेल्यांसह एकूण २०० हून अधिक विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा शनिवारी आयोजित केला होता.

येथील आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात शनिवार, दिनांक ११ जुलै रोजी आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाथ शिक्षण संस्थेचे सचिव प्रदीप खाडे हे होते. तर यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. राजेश इंगोले, युवा वक्ते तथा एक दिवसाचे मुख्यमंत्री म्हणून राहिलेले प्रा. शहाबाज मनियार, सामाजिक कार्यकर्ते भिमसेन लोमटे, शैक्षणिक क्षेत्रातील उत्तम व्यक्तिमत्व गोवर्धन लांब, शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार, स्पर्धा परीक्षा समन्वयक संतोष राऊत यांची तर विचारमंचावर संस्थाध्यक्ष कैलास चोले, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती आर. एस. बडे यांची ही उपस्थिती होती. सर्वप्रथम मान्यवरांनी प्रतिमा पूजन केले. त्यानंतर शाळेच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रारंभी प्रास्ताविक करताना शाळेच्या मुख्याध्यापिका आर.एस. बडे यांनी स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. संस्थेच्या वतीने स्कॉलरशिप टॅलेंट सर्च, ज्युनियर आयएएस, एमटीएस (जळगाव) यासह विविध परीक्षेत विद्यार्थी दरवर्षी मोठ्या प्रमाणावर सहभागी होतात. असे सांगून वर्षभर संस्था राबवित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. याप्रसंगी परीक्षेमध्ये नाविन्यपूर्ण यश स्पंदन राजेश्वर स्वामी, विवान स्वप्निल चव्हाण, भूमिका बिजयसिंग भाबरदोडे, श्रुती आदिनाथ मुसळे हे विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले तसेच यावेळी विविध मेडल्स प्राप्त २०० हून अधिक विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. याप्रसंगी इयत्ता दहावीची पहिली बॅच अतिशय उत्कृष्ट गुण घेऊन अंबाजोगाई मध्ये एक वेगळा ठसा उमटविलाबद्दल त्याही विद्यार्थ्यांचा गुणगौरव याप्रसंगी करण्यात आला. सुरूवातीला बोलताना पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी पालक व विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन करून संकल्प विद्या मंदिर शाळेच्या विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि संस्थाचालक यांचे कौतुक केले. प्रत्येक विद्यार्थ्याने सातत्यपूर्ण अभ्यास करून आई वडिलांच्या कष्टाचे चीज करावे असे आवाहन करून उज्वल भविष्यासाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी प्रा. शहाबाज मणियार, डॉ. राजेश इंगोले यांनी विद्यार्थी आणि उपस्थित पालकांशी दिलखुलास संवाद साधला व अतिशय मौलिक असे मार्गदर्शन केले. तर विद्यार्थ्यांनो खूप खेळा, खूप शिका व अभ्यास करा. आनंदी रहा असे आवाहन प्रदीप खाडे यांनी केले. यावेळी माता, पिता पालक, विद्यार्थी यांची लक्षणीय उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्पंदन स्वामी, अक्षरा निकम, भक्ती गायकवाड या इयत्ता नववी व आठवीच्या विद्यार्थ्यांनी व शिक्षिका पी.एच. नायक यांनी केले. तर उपस्थितांचे आभार शामल सुरवसे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संकल्प विद्या मंदिर शाळेचे शाळेचे सर्व शिक्षक, कर्मचारीवृंद यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाची सुरूवात राष्ट्रगीताने करण्यात आली. तर सांगता वंदे मातरम् ने झाले.

# बीडमध्ये मोफत किडनी तपासणी, मार्गदर्शन शिबिर

**बीड (प्रतिनिधी):-** बदलती जीवनशैली, मधुमेह, उच्च रक्तदाब तसेच इतर कारणांमुळे किडनीच्या आजारांचे प्रमाण दिवसेंदिवस झपाट्याने वाढत आहे. अनेक रुग्णांमध्ये सुरुवातीच्या टप्प्यात कोणतीही ठळक लक्षणे दिसून येत नाहीत. त्यामुळे आजार गंभीर झाल्यानंतरच अनेकांना डायलेसिसची गरज भासते. मात्र, वेळेत तपासणी व योग्य उपचार केल्यास किडनीचे गंभीर नुकसान टाळता येऊ शकते.

याच उद्देशाने जैन सोशल फेडरेशन, अहिल्यानगर संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल, बीड (जालना रोड, छत्रपती शाहू बँकेजवळ) येथे बुधवार, दि. १५ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या वेळेत मोफत किडनी विकार तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे विशेष आकर्षण म्हणजे किडनीच्या कार्यक्षमतेची तपासणी पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहे. किडनीचे आजार लवकर ओळखण्यासाठी ही तपासणी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या शिबिरात खालील समस्या असलेल्या नागरिकांनी आवर्जून सहभागी व्हावे मधुमेह व उच्च रक्तदाब (असलेले रुग्ण, लघवी कमी होणे, वारंवार होणे किंवा जळजळ होणे. लघवीत रक्त किंवा फेस येणे, अंगावर किंवा पायांवर सूज येणे. क्रिएटिनिन वाढलेले रुग्ण. किडनीच्या आजाराचा कौटुंबिक इतिहास असलेले नागरिक. डायलेसिस सुरू असलेले किंवा डायलेसिसची गरज भासू शकणारे रुग्णया शिबिरामध्ये सुप्रसिद्ध नेफ्रॉलॉजिस्ट डॉ. गोविंद कासट यांच्या उपस्थितीत रुग्णांची तपासणी करून आवश्यक उपचार, औषधोपचार, आहार, जीवनशैली तसेच पुढील उपचारांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच पात्र रुग्णांना महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत योजनेअंतर्गत मोफत डायलेसिस सुविधेबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. डॉक्टरांची तपासणी व घऋढ तपासणी पूर्णपणे मोफत असून, मर्यादित रुग्णांचीच नोंदणी केली जाणार आहे. त्यामुळे किडनीच्या आजाराची लक्षणे असलेल्या तसेच मधुमेह व उच्च रक्तदाब असलेल्या नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# नाथांच्या पालखीचे पाटोदा नगरीत भक्तिमय वातावरणात स्वागत

**पाटोदा (प्रतिनिधी):-** पैठण येथून आषाढी वारीसाठी निघालेल्या शांतीब्रह्म संत एकनाथ महाराजांच्या पालखी सोहळ्याचे सोमवारी (दि. १३) सायंकाळी साडेसात वाजता पाटोदा नगरीत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात आगमन झाले. पालखी शहराच्या हद्दीत दाखल होताच भानुदास -एकनाथच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. ग्रामस्थ आणि पाटोदा नगरपंचायतीच्या वतीने पालखीचे भव्य-दिव्य स्वागत करण्यात आले.

पालखी आगमनानिमित्त शहरात ठिकठिकाणी वारकऱ्यांसाठी चहा, फराळ आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. नगरपंचायतीच्या वतीने स्वागत कमानी उभारण्यात आल्या होत्या. हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण शहर भक्तिरसात न्हाऊन निघाले. छत्रपती शिवाजी महाराज चौकातून पालखीची पारंपरिक वाद्यांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. बाजारतळ, लक्ष्मी चौक मार्गे ही मिरवणूक



काळा हनुमान ठाणा मंदिर येथे पोहोचली. यावेळी संत एकनाथ महाराजांच्या पादुकांच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली. पालखी मुक्कामाच्या ठिकाणी हरिकीर्तन, भजन आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. संपूर्ण सोहळ्यात पाटोदा पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. आज मंगळवार, दि. १४ जुलै रोजी पालखी सोहळा पाटोद्यातून पारगाव घुमरा मार्गे दिघोळकडे प्रस्थान करणार आहे. पारगाव घुमरा येथे पालखी सोहळ्याचे दुसरे रिंगण पार पडणार असून, त्यानंतर पालखी पुढील मुक्कामासाठी दिघोळकडे रवाना होणार आहे. भक्तांमध्ये या सोहळ्याबाबत मोठा उत्साह असून, रिंगण सोहळ्यासाठी परिसरातील हजारो वारकरी उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

# पद्म पुरस्कारांसाठी ऑनलाइन प्रस्ताव ३१ जुलै पर्यंत सादर करावेत - डॉ. संजय तांदळे

बीड( प्रतिनिधी ) : केंद्र शासनाने जारी केलेल्या निकषानुसार पद्मभूषण पुरस्कार साठी मान्यवरांची शिफारस पद्मश्री पुरस्कार प्राप्त केल्यानंतर पाच वर्षांनी ,तर पद्मविभूषण पुरस्कारासाठी मान्यवरांची शिफारस पद्मभूषण पुरस्कार प्राप्त केल्यानंतर पाच वर्षांनी करता येईल.मात्र, अपवादात्मक प्रकरणांमध्ये ही अट शिथिल करण्याचा विचार केला जाऊ शकतो.तसेच, शासकीय सेवेतील तसेच सार्वजनिक उपक्रमांतील डॉक्टर व वैज्ञानिक वगळता अन्य कर्मचारी व अधिकारी पद्म पुरस्कार साठी पात्र राहणार नाहीत,असेही शासनाने स्पष्ट केले आहे. वंश,व्यवसाय, पद किंवा लिंगाचा कोणताही भेदभाव न करता कोणतीही व्यक्ती या पुरस्कारासाठी पात्र आहे. तथापि डॉक्टर आणि शास्त्रज्ञ वगळता, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये काम करणाऱ्यांसह कार्यरत सरकारी कर्मचारी या पुरस्कारांसाठी पात्र नाहीत. हा पुरस्कार उल्लेखनीय कार्याची दखल घेण्यासाठी दिला जातो आणि विविध क्षेत्रांमध्ये,शाखांमधील विशिष्ट व असाधारण कामगिरी किंवा सेवेसाठी प्रदान केला जातो. या क्षेत्रांची प्रातिनिधीक यादी पुढीलप्रमाणे आहे.कला- यात संगीत, चित्रकला, शिल्पकला,छायाचित्रण, चित्रपट, नाट्य इत्यादींचा समावेश होतो. समाजसेवा- यात परवडणारी आरोग्यसेवा आणि शिक्षण या क्षेत्रांतील सामाजिक व सेवाभावी कार्य, तसेच पर्यावरण, स्वच्छता इत्यादींसारख्या सामुदायिक प्रकल्पांमधील इतर योगदानाचा समावेश होतो. सार्वजनिक व्यवहार- यात कायदा, सार्वजनिक जीवन,राजकारण इत्यादी क्षेत्रांतील कार्याचा समावेश होतो. विज्ञान आणि अभियांत्रिकी - यात अंतराळ अभियांत्रिकी,अणुविज्ञान, माहिती तंत्रज्ञान,विज्ञान व संबंधित विषयांवरील संशोधन आणि विकास इत्यादींचा समावेश होतो. व्यापार आणि उद्योग - यात बँकिंग,आर्थिक घडामोडी,व्यवस्थापन, तसेच उत्पादन आदरातिथ्य (हॉस्पिटलिटी ),तंत्रज्ञान, वस्त्रोद्योग,लेखांकन,वित्त, पर्यटन इत्यादी क्षेत्रांतील व्यापार व व्यवसायाचा समावेश होतो. वैद्यकशास्त्र - यामध्ये लोपॅथी, आयुर्वेदिक, होमिओपॅथि, सिद्ध, निसर्गोपचार इत्यादींमधील वैद्यकीय संशोधन आणि विशेष प्राविण्य, विशेषज्ञता यांचा समावेश आहे. साहित्य आणि शिक्षण - यामध्ये साक्षरता आणि शिक्षणाचा प्रचार, शैक्षणिक सुधारणा, अध्यापन,पत्रकारिता, साहित्य आणि कविता, लेखन इत्यादींचा समावेश आहे. नागरी सेवा - यामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांनी प्रशासन इत्यादी क्षेत्रात मिळवलेले विशेष प्राविण्य,उत्कृष्टता यांचा समावेश आहे.क्रीडा - यामध्ये खेळ,थलेटिक्स,गिर्यारोहण खेळांना प्रोत्साहन इत्यादींचा समावेश आहे. इतर - यामध्ये वर नमूद केलेल्या क्षेत्रांमध्ये समावेश नसलेल्या क्षेत्रांचा समावेश आहे.यामध्ये यामध्ये अध्यात्म, योग,वन्यजीव संरक्षण,संवर्धन पाककला, कृषी, तळागाळातील नवोउपक्रम, पुरातत्त्वशास्त्र, वास्तुकला इत्यादींचा समावेश असू शकतो .मरणोत्तर प्रकरणे - हा पुरस्कार मरणोत्तर प्रदान केला जात नाही. तथापि, अत्यंत पात्र आणि दुर्मिळ प्रकरणांमध्ये,सरकार मरणोत्तर पुरस्कार देण्याचा विचार करू शकते. पद्म पुरस्काराच्या उच्च श्रेणीसाठी पात्रता - एखाद्या व्यक्तीला उच्च श्रेणीचा पद्म पुरस्कार तेव्हाच प्रदान केला जाऊ शकतो,जेव्हा पूर्वीचा पद्म पुरस्कार प्रदान झाल्यापासून किमान पाच वर्षांचा कालावधी उलटला असेल. तथापि, दुर्मिळ आणि अत्यंत अपवादात्मक कामगिरीच्या बाबतीत पुरस्कार समितीकडून अपवाद केला जाऊ शकतो. अलंकार - सनद( प्रमाणपत्र )आणि पदक, मुख्य पदकाची एक लहान प्रतिकृती( लघु प्रतिकृती ) प्राप्तकर्त्याला स्वातंत्रपणे दिली जाते, जी तो/ ती शासकीय/ औपचारिक कार्यक्रमांदरम्यान इत्यादी ठिकाणी परिधान करू शकतो /शकते, या पुरस्कारांसोबत कोणतेही आर्थिक अनुदान जोडलेले नाही, हा पुरस्कार कोणतीही पदवी मानली जात नाही. आणि कोणत्याही प्रकारे प्राप्तकर्त्याच्या नावापुढे प्रत्यय किंवा उपसर्ग म्हणून वापरला जाऊ नये.पुरस्कार मिळवणाऱ्यांची संख्या - एका वर्षात (म्हणून तर प्रकरणे आणि परदेशी / अनिवासी भारतीय /परदेशी नागरिक वगळून )एकूण १२० पुरस्कार दिले जाऊ शकतात. कोण करू शकतात नामांकन - नामांकन प्रक्रिया जनतेसाठी खुली आहे. स्व - नामांकन देखील केले जाऊ शकते. वरील निकषांच्या आधारे शिफारस योग्य प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय आयुक्त कार्यालय व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या स्तरावर https :// padmaawards.gov.in

या राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने ३१ जुलै २०२६ पर्यंत सादर करावेत त्यानंतर या पोर्टलवर कोणतेही नामांकन अथवा शिफारस स्वीकारली जाणार नाही. तरी पद्म पुरस्कारासाठी इच्छुक पात्र व्यक्तींनी दिनांक ३१ जुलै २०२६ पर्यंत प्रस्ताव, नामांकन राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर सादर करावेत असे आवाहन शिक्षण व करिअर कौन्सिलर डॉ. संजय तांदळे यांनी केले आहे.

# बनकरंजा-चिंचपूर रस्त्यावरील पुलाचे बोगस काम



## ४८ लाखाचा पूल एका लाथेने पडला

बीड (सरकार): गल्ली ते दिल्ली विकासाच्या नावाखाली फक्त आणि फक्त बोगसगिरी सुरू आहे. मिसिंग लिंकचा तमाशा सगळ्या जगाने बघीतल्यानंतर नांदेडच्या पुलाचे वास्तव समोर आले. आता तर खेड्यापाड्यातही तोच प्रकार सुरू असल्याचे स्पष्ट झाले. केज तालुक्यात नाल्यावर बांधलेला ४८ लाख रूपयाचा पुल एका पठ्ठ्याने लाथेने पाडला. यावरूनच त्या कामाचा दर्जा आणि विकासाचे स्वप्न कसे साकार होत आहे हे स्पष्ट होते.

केज तालुक्यातील बनकरंजा येथील बनकरंजा ते चिंचपूर या रस्त्यावर गावाच्या जवळ असणार्या नदीवर ४८ लाख रूपयाचा पूल बांधण्यात आला. काम अर्धवट आहे. मात्र या कामाचा दर्जा बघून डोक्याला हात लावण्याची वेळ आली आहे. ज्या गावाने विकासाची कामे करून राज्यात पहिला क्रमांक मिळवला त्या बनकरंजा गावाचा विकास एका व्हिडीओच्या माध्यमातून समोर आला. बांधकाम झालेला पूल एका पठ्ठ्याने एका लाथेत पाडला. अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम, कामामध्ये मुरूमाऐवजी माती, सिमेंटऐवजी मुरूम वापरल्याचे दिसत आहे. पुलाला जेथे तेथे भगदाड पडलेले. अंथरलेल्या नळ्याही फुटलेल्या, चांगला पाऊस झाला आणि या नदीला पूर आला तर अख्खा पूलच वाहून जातो की काय अशी शंका निर्माण होत आहे. गावातील काही तरूणांनी या बोगसगिरीचा पर्दाफाश केला. या गावात असेच विकासाचे अनेक कामे झाली आहेत. या पुलाच्या कामावरून त्या विकास कामाचा दर्जाही लक्षात येतो. संतप्त तरूणांनी एका लाथेत पाडलेल्या पुलाचा व्हिडिओ सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकार्यांना पाठवला. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर अधिकार्यांच्या डोळे उघडले. आपण दोन दिवसात चौकशीला येवू असा निरोप त्या अधिकार्यांनी पाठवला. खालपासून वरपर्यंत सध्या राज्यात कमिशनचे राज्य आहे. अधिकारी लोकप्रतिनिधींना भेईनात, गुत्तेदार अधिकार्यांना भेईनात, कोणाचे कोणावरही नियंत्रण राहिले नाही. जो आवाज उठविल त्याला खिंडीत पकडण्याचे काम चालू आहे.

## जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांतर्गत कंत्राटी नोकरीसाठी अर्ज सादर करावेत

बीड (सरकार): जिल्ह्यातील माजी सैनिक, त्यांच्या वीरपत्नी आणि अवलंबितांसह सर्वसामान्य नागरिकांसाठी रोजगाराची उत्तम संधी चालून आली आहे. बीड जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या बीड आणि अंबाजोगाई येथील सैनिकी मुलांच्या वसतिगृहांमध्ये विविध पदावर तात्पुरत्या, रोजंदारी आणि कंत्राटी स्वरूपात भरती प्रक्रिया राबविली जात आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज दि.२० जुलै २०२६ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बीड येथे प्रत्यक्ष जमा करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

कंत्राटी भरतीमध्ये वसतिगृह अधीक्षक (१ पद), सहाय्यक वसतिगृह अधीक्षक (२ पदे), चौकीदार (२ पदे), महिला स्वयंपाकी (४ पदे), माळी कामगार (१ पद) आणि सफाई कामगार (२ पदे) अशा पदांचा समावेश आहे. या भरती प्रक्रियेत माजी सैनिकांना विशेष प्राधान्य दिले जाणार असले, तरी नागरी उमेदवारांनाही या पदांसाठी अर्ज करण्याची मुभा देण्यात आली आहे. या भरतीसाठी अर्ज करणारा उमेदवार निर्व्यसनी असणे अत्यंत आवश्यक आहे. यातील चौकीदार हे पद निवासी स्वरूपाचे असल्याने त्यांच्या कामाची वेळ २४ तासांची असेल, तर सहाय्यक वसतिगृह अधीक्षक पदासाठी संगणकाचे ज्ञान आणि टायपिंग अवगत असणे बंधनकारक करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज दि.२० जुलै २०२६ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बीड येथे प्रत्यक्ष जमा करायचे आहेत. अर्जासोबत सैन्य सेवेतील डिस्चार्ज बुक, माजी सैनिक ओळखपत्र आणि आधारकार्ड यांच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून पात्र उमेदवारांना मुलाखतीची तारीख नंतर कळवण्यात येईल. या सुवर्णसंधीचा जास्तीत जास्त माजी सैनिक व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले असून, अधिक माहितीसाठी इच्छुकांनी ०२४४२-२२२१०५ या संपर्क क्रमांकावर विचारणा करावी. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## बीड येथे जिल्हास्तरीय स्पर्धेस १६ जुलैपासून सुरुवात

बीड (सरकार): देशातील अत्यंत प्रतिष्ठित आणि सर्वात जुनी राष्ट्रीय शालेय फुटबॉल स्पर्धा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धेच्या जिल्हास्तरीय सामन्यांना दि.१६ जुलै २०२६ पासून बीडमध्ये सुरुवात होत आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील सन २०२६-२७ या वर्षातील शालेय क्रीडा स्पर्धांचा शानदार शुभारंभ होणार आहे, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी दिली आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड मार्फत जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथील मैदानावर दि. १६ आणि १७ जुलै २०२६ या कालावधीत ही जिल्हास्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. दि. १६ जुलै २०२६ रोजी १७ वर्षांखालील मुले आणि मुलींचे सामने, १७ जुलै २०२६ रोजी १५ वर्षांखालील मुलांचे सामने आयोजित करण्यात आले आहेत. १७ वर्षांखालील वयोगटासाठी खेळाडूचा जन्म १ जानेवारी २०१० रोजी किंवा त्यानंतर झालेला असावा. १५ वर्षांखालील वयोगटासाठी खेळाडूचा जन्म १ जानेवारी २०१२ रोजी किंवा त्यानंतर झालेला असावा. तसेच, १५ वर्षांखालील खेळाडूंना एआयएफएफ मान्यताप्राप्त वय निश्चितीबाबतची चाचणी करून घेणे बंधनकारक आहे. स्पर्धेचे प्रवेश अर्ज आणि प्रवेश शुल्क पावती दि. ११ जुलै २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत स्वीकारली जाईल. जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागी होण्यापूर्वी सर्व खेळाडू व संघांची www.subrotocup.in या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करणे अनिवार्य आहे. केवळ नोंदणीकृत आणि प्रवेश फी भरलेल्या संघांनाच स्पर्धेत प्रवेश दिला जाईल.

जिल्हास्तरीय स्पर्धेत सरस कामगिरी करणाऱ्या संघांची पुढे विभागस्तर आणि राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड केली जाईल. राज्यस्तरीय स्पर्धेत विजेत्या ठरणाऱ्या संघाला नवी दिल्ली येथे 'सुब्रतो मुखर्जी स्पोर्ट्स एज्युकेशन सोसायटी'तर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या मुख्य राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. भारतीय हवाई दलाचे एअर मार्शल सुब्रतो मुखर्जी यांच्या स्मरणार्थ १९६० पासून ही स्पर्धा राष्ट्रीय पातळीवर तळागाळातील फुटबॉलला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित केली जाते. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी क्रीडा अधिकारी कालिदास होसुरकर (भ्रमणध्वनी- ९४२१५९५५१५) यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असेही कळविले आहे.

## पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे बीड जिल्हा दौऱ्यावर

बीड (सरकार) राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे या बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.



बुधवार दि. १५ जुलै २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथून वाहनाने सकाळी ११ वाजता गेवराई येथे आगमन व शहरातील विविध विकास कामांची आढावा बैठक (स्थळ : नगर परिषद सभागृह, गेवराई), सकाळी ११.४५ वाजता गेवराई येथून पाडळसिंगी ता.गेवराईकडे प्रयाण. दुपारी १२.१० वाजता आगमन व सुपरलक्ष्मी गोल्ड चक्की आटा उद्योगाचा शुभारंभास उपस्थिती. दुपारी १.३० वाजता पाडळशिंगी येथून बीडकडे प्रयाण. दुपारी २ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आगमन व परळी तिर्थक्षेत्र विकास आणि विविध शासकीय आढावा बैठकीस उपस्थिती. दुपारी ४ वाजता सह्याद्री फॅमिली रेस्टॉरंटचे उदघाटनास उपस्थिती. सायंकाळी ५ वाजता शासकीय विश्रामगृह, बीडकडे प्रयाण करतील. सायंकाळी ५.२० वाजता बीड, गेवराई व आष्टी मतदार संघाच्या कार्यकर्ते, अभ्यांगताच्या भेटीसाठी राखीव. रात्री ८ वाजतात बीड येथून परळी वैजनाथकडे प्रयाण व रात्री १० वाजता यशश्री निवासस्थान येथे आगमन व राखीव.

गुरुवार दि.१६ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ वाजता परळी, माजलगाव मतदार संघातील अभ्यांगतांच्या भेटीसाठी राखीव (स्थळ : शासकीय विश्रामगृह, परळी वैजनाथ), दुपारी १.१५ वाजता यशश्री निवासस्थान येथे आगमन व राखीव.

शुक्रवार दि.१७ जुलै २०२६ सकाळी ११ वाजता यशश्री निवासस्थान येथून वाहनाने अंबाजोगाईकडे प्रयाण. सकाळी ११.३० वाजता आगमन व जस्ट नॅचरल सेंद्रीय कॉप शॉपचे उदघाटनास उपस्थिती (स्थळ : आनंद नगर, अंबाजोगाई), दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत केज मतदार संघातील अभ्यांगतासाठी राखीव (स्थळ : जनसंपर्क कार्यालय, अंबाजोगाई), दुपारी ३.३० वाजता वाहनाने परळी वैजनाथकडे प्रयाण, दुपारी ४ वाजता यशश्री निवासस्थान येथे आगमन व राखीव. सायंकाळी ५ ते रात्री ८ वाजेपर्यंत परळी शहर व ग्रामीण कार्यकर्त्यांच्या भेटीसाठी राखीव.

शनिवार दि.१८ जुलै रोजी सकाळी ७ वाजता निवासस्थान येथून मांजरसुंबा ता .बीडकडे प्रयाण, सकाळी ८.३० वाजता आगमन व भाजपा तालुका संपर्क कार्यालयास भेट देत सकाळी ९ वाजता बीड मार्गे छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

## श्रीक्षेत्र भगवानगडाच्या पायी पालखी सोहळ्याचे पंढरपूरकडे प्रस्थान

### आ.मोनिकाताई राजळे, प्रतापराव ढाकणे, बाळासाहेब सानप यांची पालखी प्रस्थानासाठी उपस्थिती

श्रीक्षेत्र भगवानगड (सरकार) महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र भगवानगडाच्या पालखीचे आषाढी एकादशीनिमित्त आज सोमवार दि.१३ जुलै रोजी पंढरपूरकडे प्रस्थान झाले.

श्री क्षेत्र भगवानगडाचे संस्थापक, ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबा यांनी नारायणगडावर असतानाच मराठवाड्यातून पहिला पायी पालखी सोहळा प्रारंभ केला होता. हीच परंपरा भगवानगडाच्या स्थापनेपासून ते आजतागायत सुरु आहे. श्री क्षेत्र भगवानगडावरुन निघणाऱ्या या पायी पालखी सोहळ्याचे सोमवारी दुपारी ठीक ३ वाजता प्रस्थान झाले. पालखीचे मुक्काम अनुक्रमे भारजवाडी, बावी, खोकरमोह, करंजवन, डिघोळ, जयवंतनगर, कुंबेफळ, आवार पिंपरी, कुर्डुवाडी, ढेकळेवाडी या ठिकाणी होऊन अकराव्या मुक्कामाला पालखी पंढरपूरमध्ये पोहोचते. दरम्यान प्रस्थानापासून ते पंढरपूरमध्ये पोहोचेपर्यंत अनेक दिंड्या भगवानगडाच्या पायी पालखी सोहळ्यामध्ये सहभागी होतात. यामध्ये प्रामुख्याने अंभोरे येथील भोसले महाराजांची दिंडी, गुंजमुर्ती संस्थान, शेषाबाई संस्थान तांबवा, रामगड संस्थान, विठ्ठलगड संस्थान, रामेश्वर संस्थान, भगवानबाबा संस्थान सुपेसावरगांव, भोगलवाडी संस्थान, राजा हरिश्चंद्र संस्थान, जवळा ग्रामस्थ, बोरकिन्ही ग्रामस्थ, भाग्येश्वर संस्थान तरडगव्हण, गणपतबाबा संस्थान सावरगाव, कुमंडलेश्वर संस्थान घोगस पारगांव, सिद्धेश्वर संस्थान शिरुर कासार, मायंबा संस्थान भालगांव, भगवानबाबा संस्थान छत्रपती संभाजीनगर-पैठण-आळंदी, कानिफनाथ संस्थान खडकवाडी, केशवराज संस्थान वारणी,निरंजन संस्थान एकनाथवाडी, सुदर्शन गड संस्थान पाटणसांगवी, जय हनुमान संस्थान राणेगांव, दुर्गाशक्तीगड भिलवाडे, कानिफनाथ संस्थान खर्डा, हनुमान टाकळी संस्थान, शहर टाकळी



संस्थान, कानिफनाथ संस्थान खोकरमोह, सालसिद्धेश्वर संस्थान मिडसांगवी, संत भगवानबाबा संस्थान तागडगांव इत्यादी संस्थानांचा समावेश होतो. ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली निघालेल्या या भव्यदिव्य पायी पालखी सोहळ्याच्या प्रस्थानावेळी श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा, गडाचे उत्तराधिकारी ह.भ.प.श्री.कृष्णा महाराज शास्त्री, प्रधानाचार्य ह.भ.प.वेदांताचार्य श्री. नारायण महाराज शास्त्री, आमदार मोनिकाताई राजळे, प्रतापराव ढाकणे, जय भगवान महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब सानप, ह.भ.प.महंत श्री.भगवान म. राजपूत शास्त्री, ह.भ.प.महंत श्री.नवनाथ महाराज शास्त्री, ह.भ.प.महंत श्री.अतुल महाराज शास्त्री, ह.भ.प.महंत श्री.हनुमंत महाराज शास्त्री, ह.भ.प.महंत श्री.संतोष महाराज शास्त्री,

ह.भ.प.महंत श्री.केशव महाराज शास्त्री, ह.भ.प.महंत श्री.विवेक महाराज शास्त्री,ह.भ.प.महंत श्री.गणेश महाराज शास्त्री,ह.भ.प.महंत श्री.काशिनाथ महाराज शास्त्री यांसह भगवानगड परिसरातील हजारो भाविकांची उपस्थिती होती.

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीडच्या वतीने खांडेपारगाव येथे कायदेविषयक जनजागृती शिबिर संपन्न

बीड (सरकार): सर्वसामान्य नागरिक आणि तळागाळातील लोकांपर्यंत कायद्याची माहिती पोहोचावी आणि त्यांना मोफत कायदेशीर मदत मिळावी, या उद्देशाने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीडच्या वतीने आज खांडेपारगाव (ता. जि. बीड) येथे कायदेविषयक जनजागृती व मोफत कायदेशीर सेवा शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले.




हा कार्यक्रम प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष मा. श्री. दिनेश पी. सुराणा साहेब आणि वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश तथा प्राधिकरणाचे सचिव डॉ. वहाब ए. सय्यद साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

या महत्त्वपूर्ण कायदेशीर शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून बाल कल्याण समितीचे अध्यक्ष श्री. अशोक तांगडे, ज्येष्ठ समाजसेविका श्रीमती मनीषा तोकले, अधिकार मित्र श्री. मिथुन जोगदंड, अधिकार मित्र श्रीमती युगंधरा कान्नापूरकर आणि श्री. कमलेश देशमुख हे उपस्थित होते.

तसेच या कार्यक्रमाला गावाची प्रशासकीय आणि सामाजिक बाजू भक्कम करण्यासाठी सरपंच श्री. रामभाऊ अनेराव, उपसरपंच श्री. अनिल आमटे, तलाठी श्री. अक्षय ढोपे, पोलीस पाटील श्री. नितीन ठोकळ, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री. बिभीषण क्षीरसागर, खांडेपारगाव हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. खोड सर यांच्यासह गावातील आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्याा संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री. बिभीषण क्षीरसागर यांनी केले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी विविध कायदेशीर विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले.

## के.एस.के.महाविद्यालयात 'विशेष संक्षिप्त पुर्ननिरीक्षण मोहीम'

बीड (सरकार): येथील नवगण शिक्षण संस्था संचलित, सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ (काकू) कला, विज्ञान व वाणिज्य् महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग, लोकप्रशासन विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) यांच्या संयुक्त विद्यमाने 'विशेष संक्षिप्त पुर्ननिरीक्षण मोहीम'(Special Intensive Revision Campaign) अंतर्गत मतदार जनजागृती या विषयावर विशेष जनजागृती प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले होते. युवा पिढीने लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदानाचे कर्तव्य बजावणे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा व सत्र न्यायालयाचे वकील ॲड . नागेश तांबारे हे उपस्थित होते. व्यासपीठावर आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. माऊलगे एस. बी. तर राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन विभागाचे प्रमुख श्रीमती डॉ. इरलापल्ले पी. बी. या उपस्थित होत्या. याप्रसंगी बोलताना प्रमुख मार्गदर्शक ॲड नागेश तांबारे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले की, भारत हा युवकांचा देश असून लोकशाही सुदृढ करण्यासाठी प्रत्येक मतदाराने आपले नाव मतदार यादीत नोंदवणे आणि मतदानाचा हक्क बजावणे आवश्यक आहे. 'विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहिमे'चा (ड्खठ) लाभ घेऊन प्रत्येक मतदाराने आपले नाव मतदार आपल्या प्रभागातील बीएलओ कडे जावून ड्खठ फॉर्म भरुन यादीत नाव समाविष्ट करुन घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

## रोटरी क्लब ऑफ बीडच्या अध्यक्षपदी गोपाल लड्डा तर सचिवपदी सुहास बेदरे

बीड (सरकार) शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संवर्धन, युवक विकास आणि सामाजिक सेवा या क्षेत्रात अधिक व्यापक आणि परिणामकारक उपक्रम राबविण्यासाठी सर्व सदस्यांच्या सहकार्याने काम केले जाईल, असे प्रतिपादन नूतन अध्यक्ष श्रीगोपाल लड्डा आणि सचिव सुहास बेदरे यांनी यावेळी केले.बीड येथील हॉटेल अन्विता येथे रोटरी क्लब ऑफ बीडच्या ४१ व्या पदग्रहण सोहळ्यात अध्यक्षपदाची धुरा श्रीगोपाल लड्डा यांनी तर सचिवपदाची जबाबदारी सुहास बेदरे यांनी स्वीकारली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्रांतपाल हरीश मोटवानी, सहाय्यक प्रांतपाल नितीन गोपाल आणि मेंटर सुहास लाहोटी उपस्थित होते. याशिवाय रोटरी परिवारातील पदाधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर, नव्याने सहभागी झालेले सदस्य तसेच मोठ्या संख्येने सदस्य उपस्थित होते.




नूतन अध्यक्ष श्रीगोपाल लड्डा यांनी आपल्या मनोगतात आगामी वर्षातील विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. समाजातील गरजू घटकांपर्यंत सेवा कार्य पोहोचविण्यासाठी क्लबच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. शिक्षण क्षेत्रातील मदत, आरोग्यविषयक जनजागृती, पर्यावरण संवर्धन आणि युवकांना प्रोत्साहन देणारे उपक्रम राबविण्यावर भर दिला जाणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात गणेश शिंदे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी निसर्ग संवर्धन, सामाजिक जबाबदारी आणि मूल्याधारित जीवन याविषयी विचार मांडले. पर्यावरण संरक्षण आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. तसेच समाजहिताच्या कार्यात प्रत्येकाने सहभाग नोंदविण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी मावळते अध्यक्ष विकास उमापूरकर आणि मावळते सचिव सुमित जैस्वाल यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांच्या कार्यकाळात विविध सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात आले. क्लबच्या विकासासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे नियोजन क्लबच्या सर्व सदस्यांच्या सहकार्याने करण्यात आले. शेवटी सचिव सुहास बेदरे यांनी उपस्थित मान्यवर, सदस्य आणि सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)
Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)